# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,

## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


**<u>६५) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि११.१०.२०२४</u>**

**जिल्हा : अहमदनगर**

| मागील आठवड्यातील हवामान (०४/१०/२०२४ ते १०/१०/२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१२/१०/२०२४ ते १६/१०/२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | दिनांक | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ७.६ | पाऊस (मिमी) | २५ | १८ | १५ | १० | १४ |
| ३२.४ | ३२.८ | ३२.२ | ३२.० | ३२.६ | ३०.८ | २९.६ | कमाल तापमान (अंसे) | ३० | ३० | ३१ | ३१ | ३२ |
| २१.७ | २१.३ | २१.९ | २१.५ | २२.३ | २२.१ | २१.९ | किमान तापमान (अंसे) | २२ | २१ | २२ | २२ | २३ |
| - | - | - | - | - | - | ६.० | ढग स्थिती (आकाश) | ७ | ८ | ७ | ५ | ७ |
| ८६ | ८८ | ७३ | ८१ | ७८ | ८२ | ९५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९१ | ९२ | ९० | ९१ | ९० |
| ५० | ५३ | ५४ | ४६ | ६० | ६५ | ७० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७९ | ८० | ८१ | ८० | ८१ |
| १.६ | १.२ | २.१ | १.३ | १.५ | १.० | १.५ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ११ | ११ | ९ | ७ | ८ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तसेच पुढील पाच दिवस काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | फवारणी करीताना स्टीकरचा वापर करावा. |
| **संदेश** | | पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेला आणि उन्हामध्ये वाळवण्यासाठी ठेवलेला शेतं माल सुरक्षित ठिकाणी अथवा प्लॅस्टिक कागदाने झाकून ठेवावा. |
| **सोयाबीन** | **काढणी** | सोयाबीन पिकाची काढणी करून काडाचे छोटे-छोटे ढीग करून प्रखर सूर्य प्रकाशामध्ये शेतातच वाळवावे. त्यानंतर प्रादुर्भाव/ उगवण झालेल्या शेंगा बाजूला काढून मळणी करावी. |
| **बाजरी** | **काढणी** | सकाळचे वेळेस परिपक्व झालेल्या पिकाची काढणी करून घ्यावी. काढणी केलेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी. |
| **सूर्यफूल** | **पक्वता अवस्था काढणी** | सूर्यफूल पीक पारपक्व झाले असल्यास काढणी करून घ्यावी व काढणी झालेल्या पिकाची मळणी करावी. धान्य स्वच्छ करून घ्यावेत व उन्हात वाळवून कोरड्या जागी साठवणूक करावी. |
| **भुईमूग** | **साठवणूक** | पिक काढणीच्या वेळी झाडे उपटल्यानंतर शेंगाची ताबडतोब तोडणी करावी. साधारणत: ४ ते ५ दिवस उन्हामध्ये शेंगा वाळवण्यासाठी म्हणजे शेंगाचा ओलावा ८ ते १० टक्के येईपर्यंत वाळवाव्यात आणि गोदामात साठवणूक करावी. |
| **मका** | **काढणी** | काढणीला आलेल्या पिकांची काढणी करून घ्यावी. |
| **तूर** | **फुलोर्या् ची अवस्था** | पानाफुलांची जाळी करणारी अळी या किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास पहिली फवारणी ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा ३ टक्के ३०० पीपीएम ५० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| | | |
| **कांदा** | **पेरणी पुर्व तयारी** | रांगडा कांदा लागवड ऑक्टोबर अखेरपूर्वी पूर्ण करावी. यासाठी फुले समर्थ व एन-२-४-१ या वाणांचा वापर करावा. बियाण्यास अझोस्पिरिलम व स्फुरद विरघळणारे जिवाणु यांची प्रत्येकी २५ ग्रॅम प्रति किलो याप्रमणे बीजप्रक्रिया करावी. |
| **हरभरा** | **पेरणी** | १) जिरायत हरभरा पेरणी १० ऑक्टोबर पर्यंत करावी.<br>२) पेरणीपूर्वी जमिनीत २.५ किलो/ एकर या प्रमाणात ट्रायकोडर्मा पावडर चांगल्या कुजलेल्या शेणखतात मिसळून द्यावी.<br>३) पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे.<br>४) पेरणी शक्यतो सरी वरंबा किंवा बीबीएफ पद्धतीने करावी. |
| **ज्वारी** | **पेरणी** | रब्बी ज्वारी पेरणी १५ ऑक्टोबरपर्यंत करावी. पाऊस आणि जमिनीतील उपलब्ध ओलाव्याचा अंदाज घेऊन पेरणीचे नियोजन करावे. जमिनीच्या प्रकारानुसार जातीची निवड करावी. हलकी जमीनीत (खोली ३० सें.मी): फुले अनुराधा, फुले माऊली, मध्यम जमीनीत (खोली ६० सें.मी): फुले सुचित्रा, फुले माऊली, परभणी मोती, मालदांडी ३५-१, व भारी जमीनीत (६० सें.मी. पेक्षा जास्त): सुधारित वाण: फुले वसुधा, फुले यशोदा, सी.एस.व्ही. २२, पी.कें.व्ही. क्रांती, परभणी मोती संकरित वाण : सी. एस. एच. १५ आणि सी .एस.एच. १९ आणि बागायती : फुले रेवती , फुले वसुधा , सी.एस.व्ही. १८, |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| | | सी.एस.एच.१५, सी.एस.एच. १९ वाणांची निवड करावी. |
| **करडई** | **पेरणी** | रब्बी करडईची पेरणी सप्टेंबरचा दूसरा पंधरवडा ते ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पेरणी करता येते.<br>रब्बी हंगामात करडई पेरणीसाठी बियाणे, जिवाणू संवर्धके , खते इत्यादी निविष्ठांचे नियोजन करावे. तसेच करडईच्या पेरणीसाठी शिफारस केलेले सरळ/ संकरीत वाणांची निवड करावी. करडईच्या कोरडवाहु क्षेत्रात पेरणीसाठी भीमा , फुले कुसुमा , फुले करडई – ७३३ या वाणांची निवड करावी.<br>कोरडवाहु तसेच बागायती लागवडी साठी एस. एस. एफ.-७०८, फुले चंद्रभागा (एस. एस. एफ. ७४८), फुले निरा एस. एस. एफ.१२-४० , फुले भिवरा एस. एस. एफ.१३-७१ , फुले गोल्ड एस. एस. एफ.१५-६५, फुले किरण एस. एस. एफ.१६-०२, नारी-६ या वाणांची निवड करावी. |
| **ऊस** | **पेरणी पूर्व तयारी** | पूर्व हंगामी उसाची लागवड १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या दरम्यान करण्यासाठी जमिनीची पूर्व मशागत करून तयार करावी. लागवडीकरिता को- ८६०३२ (निरा) , को- ९४०१२ (फुले सावित्री), को.एम. ०२६५ (फुले -२६५), फुले १०००१ या वाणांची शिफारस आहे. |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि , राहुरी.

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.

दि. : ११.१०.२०२४

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**